## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ ची साक्ष

## निशाणी क्र. ०७ लगत

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | – | हिरालाल वना सुर्यवंशी, |
| वय | – | ३७ वर्षे, |
| व्यवसाय | – | पोकॉ. ब. क्र. ४५६, |
| सध्या नेमणुक | – | दोंडाईचा पोलीस स्टेशन, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. ए. लाली यांचे मार्फत.**

०१. घटना दि. २२.०६.२०२३ रोजीची आहे. त्यादिवशी मी दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी पोहेकॉ. कदम यांना जुनी अंजुम टॉकीजजवळ एक महिला गावठी हातभट्टी दारुची चोरटी विक्री करीत आहे अशी गुप्त बातमी मिळाली होती. त्यांनी पोनि. श्री. पवार यांना बातमी सांगितली. त्यावर श्री. पवार यांनी आम्हाला छापा टाकण्याबाबत आदेशित केले. त्यावर पोहेकॉ. कदम यांनी दोन पंचांना पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेतले व त्यांना पंच म्हणुन हजर राहण्यास विनंती केली. त्यावर ते दोघे पंच म्हणुन काम पाहण्यास तयार झाले. त्यानंतर मी, पोहेकॉ. कदम, पोना. प्रेमराज पाटील, पोकॉ. अनिल धनगर व मपोकॉ. वर्षा गोपाळ असे सदर ठिकाणी खाजगी वाहनाने रवाना झालो.

०२. आम्ही आमची वाहने श्याम सुदर प्रोव्हीजनजवळ उभे केले. त्यानंतर बातमीच्या ठिकाणी पायी चालत गेलो असता तेथे एक महिला बसलेली दिसुन आली. तिच्यावर १८.०० वाजता छापा टाकला. तिला मपोकॉ. वर्षा गोपाळ यांनी नाव गाव विचारले असता तिने तिचे नाव लक्ष्मी गणेश गारुंगे असे सांगितले. तिच्या ताब्यात आम्हाला दोन प्लॅस्टीकचे कॅन त्यामध्ये ३० लीटर गावठी हातभट्टीची दारु मिळुन आली. तसेच एक प्लॅस्टीकचा मग मिळुन आला. पोहेकॉ. कदम यांनी १८० मी. ली. दारु काचेच्या स्वच्छ बाटलीमध्ये सी. ए. तपासणीकरीता काढुन घेतली. सदर बाटलीवर पोहेकॉ. कदम व पंचांच्या सहयांचे लेबल

बुचावर लावुन ती बाटली सिलबंद करण्यात आली. तसेच उर्वरित मुद्देमाल जागीच नष्ट केला. त्यानंतर मी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील फिर्याद दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही तीच फिर्याद आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर फिर्यादीस **नि. क्र. १०** देण्यात येते.) मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकेन. आरोपी आज रोजी न्यायालयासमक्ष हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. बी. पवार यांचे मार्फत.**

०३. हे म्हणणे खरे आहे की, छाप्याचे कामी पोलीस स्टेशन बाहेर जावयाचे असल्यास त्याबाबतची नोंद स्टेशन डायरीमध्ये करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, सदरहु कामी छाप्याकरीता जात असल्याबाबतची नोंद मी स्वत: स्टेशन डायरीमध्ये केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, छापा टाकण्याकरीता माझ्या वरिष्ठांनी कोणताही लेखी आदेश दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे रहदारीचे ठिकाण असुन आजुबाजुला दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या खाजगी वाहनाने आम्ही गेल्याचे मी सांगत आहे त्या वाहनाचा नोंदणी क्रमांक अथवा त्याच्या चालकाचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या सोबत आलेल्या पंचांची लेखी संमती माझ्यासमक्ष घेण्यात आलेली नव्हती. ज्या बाटलीमध्ये नमुन्या दाखल मुद्देमाल काढुन घेतल्याचे मी सांगत आहे ती बाटली रिकामी असतांना तिचा पंचनामा माझ्यासमक्ष करण्यात आलेला नव्हता. सदर बाटली सिलबंद करण्यापुर्वी त्याच्यामध्ये माझ्यासमक्ष कोणतेही संरक्षक टाकण्यात आले नव्हते. उर्वरित मुद्देमाल नष्ट करण्यापुर्वी न्यायालयाची परवानगी घेण्यात आलेली नव्हती.

०४. हे म्हणणे खरे नाही की, प्रोहीबीशन कायदयाखालील केसेस करण्याचा आम्हाला विशिष्ट असे उद्दीष्ट दिलेले असते. हे म्हणणे खरे नाही की, तसे उद्दीष्ट पुर्ण करण्याकरीता मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी

सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द केलेली सर्व कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदरहू मुद्देमाल बेवारस असुन त्याचा आरोपीशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.01.05 17:07:04 +0530

दिनांक : ०५/०१/२०२६ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा

## <u>प्रमाणपत्र</u>

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – जी. एस. अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – ०५.०१.२०२६. |

स्वाक्षरित/–
लघुलेखक (श्रेणी–३)